


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १५० वा सोमवार दि. २१ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अब हम बोलेंगे,तुम्हारे बाप को सुनना पडेगा!

# माजी खासदार इम्तियाज जलील यांनी डागली तोफ!

**जनसंचलन/बुलढाणा**

जगह आपकी..वक्त आपका..बताईये कहाँ आना है? असे आम.संजय गायकवाडांना चॅलेंज केल्यानंतर माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शहरात दाखल होत सत्ताधाऱ्यांवर टीका करीत ललकार दिली. आम्ही सत्ते आहे, आम्ही काहीही बोलू.. या अविर्भावात आमदार गायकवाड यांच्या सारखे अनेक नेते आहे. यांचे आतापर्यंत खूप ऐकले,आता यापुढे ऐकून घेणार नाही,अब हम बोलेंगे, तुम्हारे बाप को सुनना पडेगा!... असा सणसणीत इशारा माजी खासदार जलील यांनी दिला. बुलढाणा शहरातील इक्बाल चौकात आज २० जुलै रोजी ऑल इंडिया मजलिस -ए इतेहादुल मुस्लिमीनच्या वतीने सत्कार सभा व पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी माजी खासदार इम्तिहाज जलील बोलत होते. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदार निवास येथील कॅन्टीनमधल्या कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. यावर प्रतिक्रिया देताना एमआयएमचे नेते माजी खासदार इम्तियाज जलील यांनी जोरदार हल्लाबोल केला होता. मी त्या वेटरच्या जागी असतो तर आमदार संजय गायकवाड यांची लुंगी सोडून कानशिलात लगावली असती, असे जलील यांनी म्हटले होते. त्यानंतर जलील यांच्या या वक्तव्याला आमदार संजय गायकवाड यांनी प्रत्युत्तर दिले होते. तुम्ही त्या हॉटेलचे कंत्राट घेऊन दाखवा, या वेटरला तर दोनच घुसे मारले आहेत, तुम्हाला एवढा मारेल की तुम्ही हॉटेल चालवायच्या लायकीचे सुद्धा राहणार नाही, असे आमदार संजय गायकवाड यांनी इम्तियाज जलील यांना म्हटले होते. दरम्यान इम्तियाज जलील यांनी पुन्हा याचे प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, मला धमकाविण्याची भाषा करताहेत.. आमदार




माजी खासदार इम्तियाज जलील यांनी बुलढाण्यात येउन वेळ दाखवित दिला इशारा...

गायकवाड साहेब.. जागा तुमची, वेळ तूमची .. सांगा कुठे यायचे आहे? मला तुमच्याशी काही घेणे देणे नाही.परंतू तुम्ही काही चुकीची हरकत करत असाल आणि त्या गरीबासाठी आवाज उठविणारा कोणी नसेल अन् आपले मुख्यमंत्री हसत हसत या प्रकरणा वर उत्तर देत असतील तर अशा गरीबासाठी मी जरूर उभा राहील! दरम्यान आज इम्तियाज जलील शहरात दाखल झाले असता त्यांनी हजारो संख्येत उपस्थित असलेल्या आयोजित सभेत सत्ताधाऱ्यांवर जहाल टीका केली.

---

## जिल्ह्यात जनावरे खरेदी विक्रीवर मुस्लिम खाटीक बांधवांचा बहिष्कार!

**जनसंचलन/बुलढाणा**

मुस्लिम कुरेशी खाटीक बांधवांनी जनावरांच्या कायदेशीर व्यापारात होणा-या त्रासाला कंटाळून जनावरे खरेदी विक्री करण्यास राज्यात बेमुदत बंदीची घोषणा केली आहे. टप्प्या टप्प्यात याची अंमलबजावणी होत असून बुलढाणा जिल्ह्यात देखील मुस्लिम खाटीक बांधव एकवटले आहे.२० जुलै पासून जिल्ह्यात बाजारातून जनावरांची खरेदी-विक्री करणार नाही अशी घोषणा १९ जुलैच्या रात्री बुलडाणा येथील जोहर नगर येथे आयोजित बैठकीत घेण्यात आला आहे.या निर्णयामुळे शेतकरी बांधवांच्या अडचणी निश्चित वाढणार आहे.

हाफिज रहेमत कुरेशी,माजी नगरसेवक जाकिर कुरेशी,माजी नप उपाध्यक्ष,सै.जुनेद डोंगरे,माजी नगरसेवक युनूस कुरेशी,माजी नगरसेवक मो.सज्जाद,बबलू कुरेशी,डॉ. मोबीन खान,शेख जावेद यांच्यासह इतर समाज बांधव या बैठकीत उपस्थित होते.मुस्लिम खाटीक बांधव मोठ्या प्रमाणात जनावरे खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात.अधिकृत बाजारातून ते शेतकरी व इतर व्यापाऱ्यांकडून मोठी जनावरे खरेदी करतात आणि हीच जनावरे गाडीत टाकून निघतात तेव्हा गौरक्षेच्या नावाखाली बजरंग दल व इतर हिंदुत्ववादी संघटनांचे तथाकथित कार्यकर्ते गाडी अडवून चालक,क्लिनर व व्यापाऱ्यांना अमानुषपणे मारहाण करतात व जनावरे खरेदीचे कागदपत्रे असतांना देखील पोलीस त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करतात.अश्या घटना



वाढत असतांना हा अन्याय का सहन करावा, असा प्रश्न उपस्थित करत मुस्लिम खाटीक बांधवानी जनावरे खरेदी विक्रीवर पूर्णपणे बहिष्कार टाकला असून २० जुलै पासून बुलढाणा जिल्ह्यात देखील या निर्णयावर अंमलबजावणी केली जाणार आहे. शासनाने याकडे लक्ष देऊन भविष्यात शेतकरी बांधवांची अडचण समजून योग्य ते निर्णय घ्यावा अशी मागणी देखील मुस्लिम खाटीक बांधवांनी केली आहे.

## सावित्रीच्या लेकीला एस टी महामंडळाची सावत्र वागणूक!

**जनसंचलन/ लोणार**

एसटी महामंडळ ‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ हे ब्रीदवाक्य घेऊन काम करत असल्याचा दावा करत असले, तरी प्रत्यक्षात काही चालक आणि वाहकांच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशांना दिला जाणारा प्रवासाचा हक्क डावलला जातो आहे. सावित्रीच्या लेकीला बस मध्ये प्रवेश नाकारल्याचा प्रकार लोणार येथे समोर आलाय.. यामुळे विद्यार्थिनींसह पालकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. नागपूर ते परतुर बस ही लोणार येथून परतूरकडे तळणी मार्गे जाणारी एसटी बस (लालपरी) दुपारी ४:४५ वाजता सुटली. सुलतानपूर येथे शिक्षण घेणारी शीतल राऊत ही विद्यार्थिनी रोजच्या प्रमाणे बस पकडण्यासाठी रस्त्याच्या कडेला उभी होती. बस जवळ येताच तिने हात दाखविल्याने बस थांबली देखील. मात्र, जेव्हा तिने वाहकाकडे बसमध्ये प्रवेशासाठी विचारणा केली, तेव्हा ‘ही गाडी तळणी येथे थांबत नाही’, असे स्पष्ट शब्दात वाहकाने सांगून तिला नकार देण्यात आला. दरम्यान शीतलने लगेच लोणार आगार व्यवस्थापकाशी संपर्क साधून वाहतूक नियंत्रकांशी बोलणी केली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की बस अधिकृतपणे थांबते. ही बाब आमचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित असताना घडली. बस मध्ये जागा असतानाही कंडक्टर ने विद्यार्थिनीला बसमध्ये प्रवेश नाकारला. हा प्रकार एसटी महामंडळाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. एसटी महामंडळाला तोटा होत असताना देखील, प्रवाशांना बस मध्ये न घेण्याचा कारभार चालू राहिला तर या संस्थेच्या सक्षमीकरणाबाबत मोठे प्रश्न निर्माण होतात. संबंधित चालक व वाहकावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.अशी आता मागणी केली जात आहे.

# दीड-दमडी: आणि ती पुन्हा कनेक्ट झाली!

## संपादकीय लेख

तिनं आपला डावा तळवा पुढे धरला. त्या तळव्यावर छोटी छोटी असंख्य बटणं होती आणि दोन इंचांचा छोटा स्क्रीनही होता. तळव्यावरील एका बटनाकडे तिनं रोखून पाहताच डोळ्यांमधून एक अदृष्य प्रकाशरेषा त्या बटनापर्यंत गेली आणि स्क्रीनचा रंग बदलला. त्यावर असंख्य ऑप्शन्स उमटले. मग तिनं डोळ्यांनीच त्यातील ब्रेकफास्ट ऑप्शनवर क्लिक केलं. पडद्यावर ब्रेकफास्टचे शे-दोनशे पर्याय उमटले. एका पर्यायावर नजरेनं क्लिक करता करताच तिनं गुडघ्याच्या खाली असलेलं बटन दाबलं. लगेचच तळपायांच्या दोन्ही बाजूला असलेली छोटी-छोटी चाके खोबणीतून बाहेर आली आणि रस्त्याला टेकली. आता काय कटकट आहे ही,फ म्हणत तिनं डाव्या कोपराच्या खालच्या बाजूला असलेलं छोटंसं व्हील फिरवून पायाच्या चाकांची गती कमी केली आणि तळहाताकडे पाहिलं तर स्क्रीनवर शब्द होते, ङ्गप्लीज मेन्शन क्वान्टिटी. ब्रेकफास्ट काय हवा ते सांगितलं, परंतु किती हवा ते नाही सांगितलं आपण. नवऱ्याच्या वाईट सवयी आपल्यालाही लागत आहेत, या विचारानं ती जरा चिडचिडलीच. कारण या एका चुकीमुळे तिला आज सात सेकंद उशीर होणार होता. तिनं ब्रेकफास्टची क्वान्टिटी नजरेनंच लिहिली आणि पुन्हा चाकांना गती दिली. त्यानंतर अवघ्या काही सेकंदांतच तिच्या डोक्यावर क्लाउड केटरिंगचे ड्रोन दाखल झाले. त्याने स्वतःचा वेग तिच्या वेगाशी अ‍ॅडजस्ट करत तिच्या तोंडाशी हवा तो अँगल साधला. तिने आ केला आणि ड्रोनमधून बाहेर आलेल्या यांत्रिक हाताने तिला ब्रेकफास्ट भरवायला सुरुवात केली. रस्त्यावरून अशी शेकडो माणसे धावत होती. कुणाच्या डोक्यावर अशीच ब्रेकफास्ट भरविणारी ड्रोन्स उडत होती, कुणाला धावत्या अवस्थेतच आंघोळ घातली जात होती, कुणी डोळ्यांना चष्म्याच्या आकाराचा टीव्ही बांधलेला होता, कुणाच्या डोक्यावरचे फिरते स्वच्छतागृह, त्या व्यक्तीची विसर्जनाची गरज पूर्ण करत होते. ब्रेकफास्ट संपला. ड्रोनमधून पाण्याची स्ट्रॉ बाहेर आली, तिनं पाणी पिऊन चूळ भरली, ती चूळ अर्थातच यांत्रिक हातानं एका पिशवीत झेलली आणि ड्रोन परत गेलं. मग तिनं मनातल्या मनात नवऱ्याचा क्रमांक म्हणताच त्याच्याशी तिचं कनेक्शन जोडलं गेलं, परंतु तो कोणाशी तरी बोलत असावा. कारण तिच्या उजव्या हाताच्या अंगठ्याच्या नखावर लाल अक्षरात बिझी अशी अक्षरे झळकली आणि कानाच्या पाळीत असलेल्या स्पीकरमधून ङ्गवेटिंग ट्यूनफ ऐकू आली. ङ्गहा सतत कुणाशी तरी बोलतच असतो!फ ती करवादली. इच्छित स्थळी पोहोचताच तिच्या चाकांचा वेग आपोआप कमी झाला, चाकं पायाच्या खोबणीत परत गेली. तिच्या तळहातावरचा स्क्रीन पुन्हा प्रकाशमान झाला. ङ्गसात सेकंद उशीर झाला आहे. अर्धा तास ज्यादा काम किंवा अर्ध्या तासाची वेतन-कपात, कृपया ऑप्शन क्लिक करा !फ तिनं धावता धावताच ङ्गअर्धा तास ज्यादा कामममवर क्लिक केलं. स्टेशनला जाऊन ती खुर्चीत बसताच चारही बाजूंनी तारांचे वेटोळे येऊन तिच्या शरीराला चिकटले. तिच्या डोक्यावर मध्यभागी एक चौकोनी खोबण तयार झाली, डोक्याच्या अगदी वर हवेत लटकत असलेली एक जाडजूड वायर त्या खोबणीत घुसली आणि एक प्रवाह तिच्या शरीरातून खेळू लागला. तिचे डोळे मिटले गेले आणि तोंडातून शब्द बाहेर पडले. ङ्गधिस इज एम एच २११२! रेडी टू कनेक्ट!फ ती सरकारच्या शुश्रूषा विभागात होती. ५०० वर्षांहून अधिक वय असलेल्या नागरिकांना तांत्रिक-वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचं काम तिच्याकडे होतं. ङ्गरेडी टू कनेक्टफ म्हणताच तिची खुर्ची क्षणभर हलली आणि ती वैश्विक महाजालाशी कनेक्ट झाली. तिच्या कानात कुठून तरी आवाज आला, ङ्गटेक यूवर कॉल!फ तिनं कॉल घेतला. ङ्गयेस?फ तिकडनं आवाज आला वरिष्ठानं स्माइली पाठवली आणि लिहिलं- ङ्गरिलॅक्स एम एच २११२, तू नको तिकडे भटकायला कशाला जातेस? तू पाहिलंस ते आपल्या शेजारच्या सूर्याच्या कक्षेतलं होतं. अर्थ नामक एका ग्रहावरून आलेली ड्रॅगन नावाची अवकाश कुपी, परत अर्थवर गेली. डोंट वरी, असले प्रयोग आपण दोन लाख वर्षांपूर्वीच केले आहेत!फ आणि मग एम एच २११२ निश्चिंत होऊन परत ज्येष्ठ नागरिकांशी कनेक्ट झाली!

# कु. रुखमा प्रकाश भोपळेचा एकनिष्ठा फाउंडेशननी केला सत्कार




**जनसंचलन/ डोणगाव**

तालुक्यातील निमकवळा येथील एकदम गरीब आदिवासी कुटुंबातील कु. रुखमा प्रकाश भोपळे हिला तीन वर्षा पूर्वी रक्ताची अत्यंत गरज होती त्यावेळी तिच्या नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला होता परंतु त्यावेळेस त्यांना रक्त मिळत नव्हते त्यांना सामान्य रुग्णालयातून एकनिष्ठा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या यादव यांचा नंबर मिळाला त्यांनी लगेच ४ रक्तदाते नेऊन कु. रुखमा हिच्यासाठी रक्त जमा केले मग लगेच तिला डॉक्टर कडून रक्त लावण्यात आले होते. तिची प्रकृती सुधरताच तिने एकनिष्ठा फाउंडेशनचे आभार मानले व भविष्यात मि सुद्धा एकनिष्ठा फाउंडेशनच्या उपक्रमा मध्ये सहभागी होऊन लोकांची मदत करेल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती सुरजभैय्या यादव यांनी तिला धिर दिला आणि तिला एकच वाक्य सांगितले होते की तू अभ्यासाकडे लक्ष दे तुझे जे काही स्वप्न आहे ते लवकर साकार होतील मागील तीन वर्षा पासून जिद्द चिकाटीने मेहनत लगन लावून अभ्यास करून परीक्षा उत्तीर्ण करत घव घवीत यश संपादन करत शेवटी कु. रुखमा प्रकाश भोपळे राहणार निमकवळा हिची अप्पर आदिवासी विकास आयुक्त ठाणे शासकीय अधीक्षक पदी निवड झाली. दिनांक १८ रोजी दुपारी २ वाजता तिचा सत्कार एकनिष्ठा रक्तदाता फाउंडेशन तर्फे शासकीय रक्तपेढी मध्ये रक्तदान करून बुके देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सुरजभैय्या यादव , सौ. शिल्पा सिंघानिया, जय पारीक , निखिल हजारे , आदर्श साकला, ओम सिंघानिया , शासकीय रक्तपेढीचे डॉ. प्रणाली देशमुख , टेक्निशियन सपना कांबळे , चित्रा देशपांडे , राजश्री पाटील , परिचारीका भारती काळे , कर्मचारी वैभव रेठेकर आदि लोक उपस्थित होते अशी माहिती प्रदीप शमी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात करिअर संसद शपथविधी सोहळा संपन्न!!

**जनसंचलन/नांदुरा**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित, श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या ङ्कङ्खकरिअर कट्टाङ्कङ्ख या उपक्रमांतर्गत मंगळवार दि. १५ जुलै २०२५ रोजी स. ११ वा. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अलका मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात करिअर संसदेमधील विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथील प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर उपस्थित होते. करिअर संसदेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधून मंत्रीमंडळ निवड करण्यात आली होती. करिअर संसदेमधील निवड झालेल्या सर्व विध्यार्थ्यांना करिअर कट्टा मार्फत दिनांक १ जुलै ते १४ जुलै पर्यंत प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यामध्ये मुख्यमंत्री कु. पल्लवी गणेश मारोडे, नियोजन मंत्री कु. प्राची शिवशंकर सुमरे, कायदे व शिस्तपालन मंत्री कु. निकिता ईश्वर कोल्हे, सामान्य प्रशासन मंत्री दुर्गेश संतोष कळसकर, माहिती व प्रसारण मंत्री कु. गायत्री महादेव झांबरे, उद्योजकता विकास मंत्री अमित लक्ष्मण किनारकर, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री कु. अंबिका विलास नारे, कौशल्य विकास मंत्री कु. वैष्णवी गजानन सातव, संसदीय कामकाज मंत्री कु. वैष्णवी सुभाष सायखेडे, महिला व बालकल्याण मंत्री कु. साक्षी माणिक जवरे, सदस्य अभिषेक गणेश ठाकरे यांची निवड करण्यात आली. तसेच सर्वांना नियुक्तीपत्र, प्रमाणपत्र व करिअर डायरी देऊन गौरविण्यात आले. सरांनी मार्गदर्शक भाषणामध्ये बोलतांना सांगितले कि, महाविद्यालयीन जीवनामध्ये विध्यार्थानी स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेतला पाहिजे, महाविद्यालयातील विविध उपक्रमामध्ये भाग घेतला पाहिजे, देश विदेशात विविध संधी विद्यार्थ्यसाठी उपलब्द आहेत त्याची माहिती सरानी दिली तसेच निवड झालेल्या मंत्री मंडळातील सदस्यांनी आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडावे असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अलका मानकर यांनी अध्यक्षीय भाषणात निवड झालेल्या मंत्री मंडळातील सदस्यांनी आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडावे असे सांगितले तसेच करिअर कट्टा उपक्रमाविषयी माहिती देऊन सर्व मंत्री मंडळाला शुभेच्छा दिल्या.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# संसद अधिवेशन आजपासून; सर्व मुद्द्यांवर होणार चर्चा, सर्वपक्षीय बैठकीत केंद्र सरकारची विरोधकांना ग्वाही...

**नवी दिल्ली:** संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारला कोंडीत पकडण्यासाठी विरोधकांनी शनिवारी अष्टसूत्री रणनीती आखल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, रविवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधकांच्या सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्यास तयार असल्याचे सरकारने नमूद केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ङ्गऑपरेशन सिंदूरफ्संबंधीच्या दाव्यांवर उत्तर देण्याच्या मागणीलाही योग्य प्रतिसाद देण्यात येईल, अशी ग्वाही सरकारकडून देण्यात आली.आज, सोमवारपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनापूर्वी शिष्टाचारानुसार झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधकांनी बिहारमधील मतदारयाद्यांची सखोल फेरपडताळणी, पहलगाम दहशतवादी हल्ला आणि भारत-पाक संघर्षविरामाबाबतचे ट्रम्प यांचे



दावे यांसह विविध मुद्दे उपस्थित केले. त्या सर्वांवर चर्चेची तयारी दाखवतानाच महिनाभर चालणाऱ्या अधिवेशनाचे कामकाज सुरळीत चालावे, यासाठी विरोधी पक्षांनी सहकार्य करण्याची अपेक्षा सरकारने व्यक्त केली. सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर द्यावे, असा विरोधकांचा आग्रह आहे. मात्र, तसे होण्याची शक्यता कमी असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.या अधिवेशनात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह ङ्गऑपरेशन सिंदूरफ्वर सविस्तर निवेदन सादर करण्याची शक्यता आहे. त्यांनी शुक्रवारी सायंकाळी त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसोबत दोन महत्त्वाच्या बैठका घेतल्या. तसेच, वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसोबतही त्यांची एक बैठक झाली. ङ्गऑपरेशन सिंदूरफ्बाबत सरकारची भूमिका मांडण्यासाठी संसदीय शिष्टमंडळांनी केलेल्या विदेशदौऱ्यातील फलितावर प्रकाश टाकण्यासाठी या मुद्द्यावर चर्चा व्हावी अशी ङ्गएनडीएफ्तील नेत्यांसह अनेक नेत्यांची इच्छा आहे. सरकार आपली बाजू मांडण्याची जबाबदारी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याकडे देऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले.संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सरकार आणि विरोधी पक्षांत समन्वय असायला हवा. ङ्गऑपरेशन सिंदूरफ्संबंधी ट्रम्प यांच्या दाव्यांचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केल्यास सरकार संसदेत योग्य उत्तर देईलफ्, असे संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले. ङ्गसरकार नियम आणि परंपरांनुसार ङ्गऑपरेशन सिंदूरफ्सह सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर संसदेत चर्चा करण्यास तयार आहेफ्, असेही ते म्हणाले.सर्वपक्षीय बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना काँग्रेस नेते गौरव गोगोई म्हणाले की, ङ्गआमच्या पक्षाने ट्रम्प यांचे दावे, पहलगाम हल्ल्याला कारणीभूत ठरलेल्या चुका आणि बिहारमधील मतदारयाद्यांच्या पडताळणीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे निवेदन मागितले आहे. हे त्यांचे कर्तव्य आहे.फ्केंद्रीय मंत्री आणि राज्यसभेतील सभागृह नेते जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला विविध राजकीय पक्षांचे नेते उपस्थित होते. रिजिजू आणि त्यांचे कनिष्ठ मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनीही बैठकीत सरकारचे प्रतिनिधित्व केले. काँग्रेसचे गोगोई आणि जयराम रमेश, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या सुप्रिया सुळे, द्रमुकचे टी.आर. बालू आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले हेसुद्धा उपस्थित होते.

# सचिन यांनी सांगितला संजीव कुमार यांचा किस्सा; नेटकऱ्यांना रुचेना, म्हणाले, आता संत्या १००० मतांनी पिछाडीवर

**मुंबई** - सचिन पिळगावकर यांनी त्यांचे अनेक किस्से मुलाखतीदरम्यान सांगितले आहेत. त्यावरून त्यांना बऱ्याचदा ट्रोलसुद्धा करण्यात येतं. त्यांचे हे किस्से सोशल मीडियावर व्हायरल होतात. अशातच आता सचिन पिळगावकर यांचा आणखी एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.रेडिओ सिटीला दिलेल्या मुलाखतीमध्ये १९६३ मध्ये प्रदर्शित झालेल्या हा माझा मार्ग एकला या सिनेमाच्या संबंधित एक किस्सा सांगितला आहे. हा सिनेमा राजा परांजपे यांनी दिग्दर्शित केला होता. या सिनेमात सचिन पिळगावकर यांनी बालकलाकारची भूमिका साकारलेली. तेव्हा ते फक्त अवघ्या सात वर्षांचे होते.या मुलाखतीदरम्यान सचिन म्हणाले की, अभिनेते संजीव कुमार हे माझा चित्रपट हा माझा मार्ग एकला... पाहण्यासाठी गेले होते. त्यानंतर त्यांनी सहकाऱ्याला माझा पत्ता विचारला. घरी येण्यापूर्वी सांताक्रुझमधील एका स्टेशनरीच्या दुकानात गाडी थांबली, तेथून ऑटोग्राफ बुक घेतली. संजीव यांनी दरवाजा ठोठावला. माझ्या बाबांनी दरवाजा उघडला तर समोर संजीव कुमार होते. त्यांनी विचारलं सचिन आहे का? त्याला बोलवा. मग मी आलो. त्यांनी मला सांगितलं की, मी आताच तुझा हा माझा मार्ग एकला.. चित्रपट पाहून आलोय. मी आतापर्यंत कधीच कोणाचा ऑटोग्राफ घेतलेला नाही. माझ्या आयुष्यातला पहिला ऑटोग्राफ मी घेऊ इच्छितो. त्यांनी



माझ्यासमोर वही ठेवली, डायरी ठेवली. मग मी त्यांना ऑटोग्राफ दिली.सचिन पिळगावकर यांचा मुलाखतीचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतोय. त्यावर कमेंट करत नेटकऱ्यांनी अभिनेत्याला ट्रोल केलं आहे. एका नेटकऱ्याने सचिन यांची तुलना संतोष जुवेकरसोबत केली असून कमेंट करत लिहिलं की, आता संत्या १००० मतांनी पिछाडीवर तर पुढे आता हे नवीन प्रकरण, ऐ डिकरा.....काय पण बोलते.... काय पण फेकते.... अशा कमेंट्स करत सचिन यांना ट्रोल केलंय.दरम्यान, सचिन पिळगावकर यांच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर त्यांनी नादिया के पार, नवरा माझा नवसाचा, नवरा माझा नवसाचा २, अशी ही बनवाबनवी, अखियों के झरोंखोसे, बालिका वधू, गीत गाता चल, शोले, गंमत जंमत, कट्यार काळजात घुसली, आयत्या घरात घरोबा यांसारख्या गाजलेल्या हिंदी आणि मराठी सिनेमांमध्ये काम केलं आहे.

# किल्ले रायगड पाहून परतणाऱ्या बसचा भीषण अपघात, ११ जण जखमी...

**रायगड :** छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगडचे दर्शन घेऊन पुणे येथे निघालेल्या खाजगी बसचा रायगड-महाड रोडवरील घरोशी वाडी येथे अपघात झाला आहे. बस वेगात असताना अचानक उलटली. या बसमध्ये ३२ प्रवासी प्रवास करत होते. यापैकी ११ प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. ही घटना रविवारी दुपारी ४ वाजता घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. किल्ले रायगडवर पावसाळी पर्यटन करून पुण्याकडे परतणाऱ्या खाजगी आराम बस क्रमांक १४ ७२४५ या गाडीचा महाडच्या हद्दीवर घरोशी वाडी येथे दुपारी चारच्या सुमारास मोठा अपघात घडला. बसमधून प्रवास करणाऱ्या ३२ प्रवाशांपैकी ११ जण जखमी झाल्याची माहिती पाचाड आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली आहे.या अपघाताचे वृत्त समजतात महाड तालुका पोलीस स्टेशन आणि पाचाड दूर क्षेत्र स्थानकातील पोलीस स्टेशनच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी प्रवासी



वर्गाला तातडीने प्राथमिक केंद्रामध्ये आणण्याची सुरुवात केली. पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी शैलेश मालदे यांनी यासंदर्भात जखमी असलेले प्रवासी यांना किरकोळ स्वरूपाच्या जखमा झाल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधींशी भ्रमणध्वनीद्वारे बोलताना दिली आहे. जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांना घरी सोडण्यात येणार असल्याची माहिती पाचाड आरोग्य केंद्राच्या सूत्रांनी दिली आहे.अनिकेत आघाव (२२ वर्ष), किरण घाविल (२९ वर्ष), आशिष अंभोरे (२४ वर्ष), तुकाराम चोपडे (२० वर्ष), भीमा कांबळे (२१ वर्ष), तुळशीराम यादव (१९ वर्ष), शिवानी जाधव (२३ वर्ष), जानवी पारकर (२४ वर्ष), माधुरी ठोकळ (२० वर्ष), दिव्या अहिल्या (२९ वर्ष), तेजस पाटील आदी प्रवासी या दुर्घटनेत जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रमीच्या व्हायरल व्हिडिओवर कृषीमंत्री म्हणाले, मी हा गेम खेळत होतो...; रोहित पवारांवरही केला प्रहार...



**मुंबई :** महाराष्ट्राचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात अडकल्याचे पाहायला मिळाले. यातच आता त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाल्याने ते वादात अडकले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे नेते रोहित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर विधानसभेत रमी खेळत असल्याचा आरोप केला, ज्यामुळे राजकीय खळबळ उडाली आहे. तर काँग्रेसनेही याबाबत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.मुंबई : महाराष्ट्राचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात अडकल्याचे पाहायला मिळाले. यातच आता त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाल्याने ते वादात अडकले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे नेते रोहित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर विधानसभेत रमी खेळत असल्याचा आरोप केला, ज्यामुळे राजकीय खळबळ उडाली आहे. तर काँग्रेसनेही याबाबत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.रोहित पवार यांनी कोकाटे यांचा विधानसभेतील एक व्हिडिओ शेअर केला. ज्यामध्ये ते मोबाईलवर एक गेम खेळत असल्याचे दिसत आहेत. यावर रोहित पवार म्हणाले की, सत्ताधारी राष्ट्रवादी गटाला भाजपाशी सल्लामसलत केल्याशिवाय काहीही करता येत नाही. राज्यात रोज आठ शेतकरी आत्महत्या करत असताना, कृषिमंत्र्यांना रमी खेळण्यासाठी वेळ आहे. शेतकऱ्यांना पीक विमा, कर्जमाफी आणि भाव आधाराची गरज आहे, पण मंत्र्यांना याची पर्वा नाही. पवारांनी हा ङ्कशेतकऱ्यांचा अपमानफ असल्याचा उल्लेख केला आहे.कोकाटे यांनी रोहित पवारांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना म्हटले की, मी रमी नाही, तर सॉलिटेअर हा खेळ खेळला होता. रोहित पवारांवर प्रहार करताना ते म्हणाले, रोहित पवारांना रमी खेळण्याची सवय आहे, म्हणून त्यांना वाटले की, मी रमी खेळतोय. माझ्या मोबाइलवर सॉलिटेअर हा गेम माझ्या पीए किंवा ओएसडीने डाउनलोड केला असावा. मी यूट्यूबवर विधानसभेच्या खालच्या सभागृहातील कामकाज पाहत होतो, असे स्पष्टीकरण त्यांनी दिलं

यावर मिश्कील प्रत्युत्तर देताना कोकाटे म्हणाले, रमी म्हणजे काय, हे मला माहितच नाही. पवारांना रमी खेळण्याची सवय असावी, म्हणून त्यांनी असा आरोप केला. यूट्यूबवर १० प्रकारच्या जाहिराती येतात, त्या ३० सेकंद पाहाव्या लागतात, स्किपही करता येत नाही.

# प्राजक्ता माळीने हातावर गोंदवलंय या खास व्यक्तीचं नाव...



**मुंबई -** प्राजक्ता माळी ही मराठी कलाविश्वातील आघाडीची अभिनेत्री असून उत्तम अभिनयाच्या बळावर तिनं प्रेक्षकांच्या मनात स्वतः चं अढळ स्थान निर्माण केलं आहे. प्राजक्ताला झी मराठी वाहिनीवरील जुळून येती रेशीमगाठी या मालिकेमुळे प्रचंड लोकप्रियता मिळाली आणि ती घराघरांत पोहोचली. प्राजक्ता तिच्या प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. तुम्हाला माहितीये का? प्राजक्ताने तिच्या हातावर एका खास व्यक्तीचा टॅटू काढला आहे. त्याबद्दल स्वतः प्राजक्ताने खुलासा केला होता. कोण आहे ही खास व्यक्ती जाणून घ्या.प्राजक्ता माळी सोशल मीडियावर कायम सक्रीय असते आणि तिच्याविषयीचे अपडेट्स चाहत्यांना पोस्ट मार्फत देते. त्याचबरोबर अभिनेत्री तिचे काही हटके फोटोसुद्धा शेअर करते. अशाच काही फोटोंमध्ये प्राजक्ताच्या हातावरचा टॅटू दिसून येतो. पण या टॅटूचा नेमका अर्थ काय? असा प्रश्न चाहत्यांना पडतो. राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीमध्ये प्राजक्ताने आपला टॅटू दाखवत, टॅटू काढण्यामागचं कारण सांगितलं होतं. प्राजक्ताला आपल्या हातावर काहीतरी हटके असा टॅटू पाहिजे होता.त्याबद्दल बोलताना अभिनेत्री म्हणलेली की, मी ओशोंबद्दल खूप वाचन करायचे, त्यांच्या सीडी ऐकायचे. माझी त्यांच्यावर अपार श्रद्धा आहे. मला त्यांचे सगळे विचार पूर्णतः पटायचे. मला सगळ्यांसारखं फुलं, हृदय, चंद्र, चांदणं अशा कॉमन गोष्टी टॅटू म्हणून नको होत्या. मला काहीतरी वेगळं हवं होतं. मला टॅटू म्हणून अशी एखादी गोष्ट हवी होती जी प्रेरणादायक असेल आणि धर्माशी निगडित नसेल. तेव्हा मी ओशोंची भक्त झाले होते आणि त्यांच्या मते धर्म वगैरे असं काही नसतं. मी पण जात, धर्म अशा गोष्टी मानत नाही. त्यामुळे मी ठरवलं की ओशो हे धर्मनिरपेक्ष नाव आपण गोंदवु शकतो आणि मी त्या नावाचा टॅटू गोंदवला. दरम्यान, प्राजक्ता माळीच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर ती २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या फुलवंती या सिनेमामुळे चर्चेत आली होती. या सिनेमातील तिच्या नृत्याचं कौतुकही झालं. त्याचबरोबर अभिनेत्री प्रसाद खांडेकर दिग्दर्शित चिकी चिकी बुबुम बुम या २८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित झालेल्या चिकी चिकी बुबूम बूम या सिनेमातसुद्धा झळकली होती.

# ठाकरे बंधुंप्रमाणेच राजकारणात ठाकरे आणि शिंदेंचंही मनोमिलन होणार, शिवसेनेच्या मंत्र्याचं मोठं भाकीत...

**मुंबई :** पाच जुलैल्या झालेल्या विजयी मेळाव्यात दोन्ही ठाकरे बंधू तब्बल २० वर्षांनी एकाच व्यासपीठावर आलेले पाहायला मिळाले. याचनिमित्ताने आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीच्या चर्चांना बळ मिळाले आहे. परंतु युतीच्या निर्णयावर अद्याप शिक्कामोर्तब झालेला नाही. यातच शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठं विधान केलं आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंचंही मनोमिलन होऊ शकतं, असे सरनाईक म्हणाले आहेत.एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर शिवसेनेत फूट पडली. दोन्ही गटातील नेत्यांकडून एकमेकांवर आरोपास्त्र डागले जात आहेत. तसेच नेत्यांमध्येही एकमेकांबाबत राजकीय वैर आहे. यामुळे दोन्ही शिवसेना एकत्र येण्याची शक्यता मावळत असतानाच प्रताप सरनाईकांनी मोठं वक्तव्य केलं आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे जसे एकत्र आले तसे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेही एकत्र येऊ शकतात, असे सरनाईकांनी म्हटले आहे. यामुळे राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान गेल्या काही दिवसांपासून आमदारांचे वादग्रस्त व्हिडीओ समोर आले असून अधिवेशनातही हे मुद्दे गाजले आहेत. यावर देखील प्रताप सरनाईक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमच्या पक्षातील आमदारांकडून काही विधानं करण्यात आले, त्यामुळे एकनाथ शिंदे नाराज होते, शिंदेंनी आमदारांना सक्त सूचना देखील दिल्या आहेत. आमच्याच आमदारांच्या तक्रारी आहेत असं नाही, सगळ्याच पक्षातील आमदार बोलतात, असे सरनाईकांनी नमूद केले.उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेवर मोठा आरोप केला होता. जादूटोणा करून आमदार निवडून आले, असा दावा ठाकरेंनी केली. यावर प्रतिक्रिया देताना सरनाईक म्हणाले, तुमचे आमदार निवडून आले हे काय जादूटोणा न करता आले? आणि आमचे जादूटोणा करून आले का? तुमचे लोकसभेला खासदार जादूटोणा करूनच निवडून आले होते का? असा सवाल सरनाईक यांनी यावेळी केला. एकनाथ शिंदे शिवसेनेचे ब्रँड आहेत. आमच्या पक्षाचा ब्रँड म्हणजे एकनाथ शिंदे, असंही यावेळी सरनाईक यांनी म्हटलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# टेस्लाची पहिली धाव मुंबईत, मध्ये मुख्यमंत्र्यांकडून उद्घाटन, सर्वात महागडं मॉडेल उपलब्ध, किंमत काय?

**मुंबई :** अमेरिकेसह इतर देशांमधील ऑटोमोबाइल क्षेत्रात शिरकाव केल्यानंतर बहुचर्चित टेस्लाने भारतीय ऑटोमोबाइल क्षेत्रात मंगळवारी पदार्पण केले. मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात एक प्रशस्त शो-रूम सुरू करत ङ्कटेस्लाफ आयएनसी या कंपनीने जगातील तिसऱ्या सर्वात मोठ्या ऑटोमोबाइल बाजारपेठेकडे आपला मोर्चा वळवला. या शो-रूमचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. ङ्कटेस्लाफ सुरुवातीला त्यांच्या मॉडेल वाय या गाडीच्या माध्यमातून भारतीय बाजारपेठेत उतरत असून या गाडीच्या अगदी सुरुवातीच्या व्हेरियंटची किंमत ६० लाख रुपये एवढी आहे. संपूर्णपणे स्वयंचलित असलेल्या ङ्कटेस्लाफच्या गाड्यांची चर्चा भारतीय ऑटोमोबाइल क्षेत्रात आधीपासूनच होती. मात्र मंगळवारी ही प्रतीक्षा संपली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ङ्कटेस्लाफच्या अनुभव केंद्राचे उद्घाटन केले. ङ्कटेस्लाफने लवकरच भारतात त्यांचे संशोधन आणि विकास व बांधणी केंद्र उभारावे. ङ्कटेस्लाफ नक्कीच त्याबाबत गांभीर्याने विचार करेल, अशी प्रतिक्रिया या वेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.भारताने इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिले असतानाच ङ्कटेस्लाफचा भारतीय बाजारपेठेतील प्रवेश कंपनीसाठी फायद्याचा ठरू शकतो, अशी अटकळ ऑटोमोबाइल क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करतात.

सध्या भारतीय बाजारपेठेत दरवर्षी विकल्या जाणाऱ्या गाड्यांपैकी दोन टक्के गाड्या इलेक्ट्रिक आहेत. पण हे प्रमाण वर्षागणिक वाढत असल्याचे चित्र आहे.भारताने इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिले असतानाच ङ्कटेस्लाफचा भारतीय बाजारपेठेतील प्रवेश कंपनीसाठी फायद्याचा ठरू शकतो, अशी अटकळ ऑटोमोबाइल क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करतात. सध्या भारतीय बाजारपेठेत



दरवर्षी विकल्या जाणाऱ्या गाड्यांपैकी दोन टक्के गाड्या इलेक्ट्रिक आहेत. पण हे प्रमाण वर्षागणिक वाढत असल्याचे चित्र आहे.ङ्कटेस्लाफ इंडिया सुरुवातीला भारतात मॉडेल वाय गाड्यांची विक्री सुरू करणार आहे. या गाड्यांची किंमत ७० हजार अमेरिकन डॉलर्स किंवा ५९ लाख ८९ हजार रुपये असेल. तसेच या गाडीचे सर्वात महागडे मॉडेल भारतीय बाजारपेठेत ६७ लाख ८९ हजार रुपये किमतीला उपलब्ध होणार आहे. अमेरिकन बाजारपेठेतील ङ्कटेस्लाफच्या किमतीशी तुलना करता ही किंमत तिप्पट आहे.

भारतात आयात केलेल्या गाड्यांवर ७० ते ११० टक्के कर आकारला जात असल्याने ही किंमत जास्त आहे.टेस्लाची ही ईव्ही गाडी बीएमडब्ल्यू आणि मर्सिडिज बेन्झ या कंपन्यांच्या गाड्यांना टक्कर देईल. त्याचा परिणाम महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, आदी कंपन्यांच्या गाड्यांच्या विक्रीवर होण्याची शक्यता कमी असल्याचेही ऑटोमोबाइल तज्ज्ञ सांगतात. मात्र, या गाडीमुळे भारताच्या ईव्ही गाड्यांच्या बाजारपेठेत नक्कीच सुधारणा होईल, असाही विश्वास व्यक्त होत आहे.


# शाईफेकीनंतर पुण्यात हालचाली, शरद पवार आणि प्रवीण गायकवाड यांच्यात बंद दाराआड चर्चा...

**पुणे :** संभाजी ब्रिगेड संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांची आज पुण्यात भेट झाली. दोन्ही नेत्यांमध्ये आज बंद दाराआड चर्चा झाली. प्रवीण गायकवाड यांच्यावर दोन दिवसांपूर्वी सोलापुरात शाईफेक झाली होती. तसेच शाईफेक करणाऱ्यांनी प्रवीण गायकवाड यांना धक्काबुक्की केल्याचं देखील व्हिडीओमध्ये समोर आलं होतं. या घटनेनंतर शरद पवार यांच्या पक्षाकडून घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला होता. यानंतर प्रवीण गायकवाड आणि शरद पवार यांची भेट आज घडून आली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली. या चर्चेनंतर प्रवीण गायकवाड यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.रविवारी जी घटना घडली ती घडल्यापासून महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते मला सातत्याने फोन करत आहेत, घटनेची माहिती घेत आहेत. शरद पवार यांनी अनेक कॉल केले होते. सध्याची परिस्थिती योग्य नाही काळजी घे असं त्यांनी सांगितलं होतं. शरद पवारांनी दोन ते तीन वेळा फोन केला होता. शरद पवारांची आज पुण्यात भेट घेऊन घडलेला सगळ्या प्रकार सांगितला. माझा जो संशय आहे की मला मारण्याचा कट होता तो देखील सांगितला, अशी प्रतिक्रिया प्रवीण गायकवाड यांनी दिली.मंत्री चंद्रशेखर बावनकुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष असताना दीपक काटे त्यांच्यासोबत असायचे. दीपक काटे बावनकुळे यांना गॉडफादर मानतात. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालावं, अशी माझी अपेक्षा असल्याचे शरद पवार यांना सांगितलं आहे. सध्याची परिस्थिती जी आहे, अनेकांवर असे निशाणे साधले जाऊ शकतात, अशी माहिती मी शरद पवार यांना दिली, असं प्रवीण गायकवाड यांनी सांगितलंसंपूर्ण परिस्थितीवर मी लक्ष ठेवून आहे. संपूर्ण प्रकरणाची माहिती मी घेत आहे. माझ्या पद्धतीने सरकारला माहिती कळवतो, असं शरद पवारांनी सांगितलं. तसेच पोलिसांनी सहकार्य केलं नाही म्हणून मी आता पोलीस संरक्षण घेणार नाही, असं मी शरद पवार यांना सांगितलं आहे. अनेक मंत्री पोलिसांवर दबाव ठेवून आहेत. दोन दिवसात दीपक काटे यांना सोडून द्या असं अनेक मंत्र्यांनी पोलिसांना सांगितलं आहे, असं प्रवीण गायकवाड म्हणाले.

# हिवाळी अधिवेशनावर निवडणुकीचे सावट, घोषणांवर येणार मर्यादा; सरकारची तयारी कशी?

**नागपूर :** उपराजधानीत येत्या आठ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे सावट राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थानिक संस्थांच्या निवडणुका झाल्यास राज्याच्या बहुतांश भागात आदर्श आचारसंहिता लागू राहू शकते. त्यामुळे सरकारकडून कोणत्या घोषणा होऊ शकतात, याचा अंदाज आतापासूनच घेतला जात आहे.महापालिका व जिल्हा परिषदांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डिसेंबर अखेरीस किंवा नवीन वर्षात होण्याची शक्यता आहे. प्रभाग रचनेचा सुधारित कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात अंतिम प्रारूप यादी प्रसिद्ध होईल.प्रभाग रचनेनंतर आरक्षणाची प्रक्रिया राबवण्यासाठी साधारणतः एक महिन्याचा कालावधी लागतो. यावर सूचना आणि हरकती मागवण्यात येतील. यासोबतच मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन केले जाते. ही प्रक्रिया देखील एक ते दीड महिना चालेल. साधारणतः नोव्हेंबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात निवडणुकीची घोषणा होऊ शकते, असा जाणकारांचा अंदाज आहे. राज्य निवडणूक आयोगाला ईव्हीएम आणि निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक अधिकाऱ्यांसह इतर मनुष्यबळ व सुरक्षा यंत्रणा कशी उपलब्ध होते, त्यानुसार निवडणुकीचे टप्पे ठरतील. निवडणुकीची घोषणा झाल्यापासून ४५ दिवसांत मतदान व मतमोजणी करण्यात येते.नोव्हेंबरमध्ये घोषणा झाल्यास आचारसंहिता लागू होईल. त्याचप्रमाणे नेतेमंडळी देखील व्यूहरचना आणि प्रचारात व्यस्त राहतील. आचारसंहितेमुळे सरकारला पॅकेज किंवा मतदारांना आकर्षित करणाऱ्या घोषणा करता येणार नाहीत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

दरम्यान, राज्यातील ६८७ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याचे नियोजित असल्याची माहिती आहे. पहिल्या टप्प्यात ऑक्टोबरमध्ये पंचायत समिती, नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका



घेण्याची चाचपणी सुरू आहे. तर नोव्हेंबरमध्ये जिल्हा परिषदांच्या, तर सर्वांत शेवटी डिसेंबरमध्ये महापालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) मर्यादित संख्या डोळ्यासमोर ठेवून राज्य निवडणूक आयोगाने एकाच वेळी या निवडणुका घेण्यास असमर्थता दर्शविल्याची माहिती आहे. तर निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याचे नियोजन असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

# पुण्यात पुन्हा भोंदू बाबाचं काळा चेहरा समोर, भविष्य सांगण्याच्या बहाण्याने तरुणीला भुलवलं अन् नंतर एकांतात नेऊन...

**पुणे :** भोंदूबाबाने गैरप्रकार केल्याचे वारंवार समोर येत आहे. अशातच पुण्यातून एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. पुण्यात एका भोंदू बाबाने भविष्य सांगण्याच्या बहाण्याने एका २५ वर्षीय तरुणीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला आहे. सहकारनगर पोलिसांनी आरोपी भोंदू बाबा अखिलेश लक्ष्मण राजगुरू याला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. तर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. पुण्याच्या धनकवडी परिसरात ही घटना घडली. वृत्तानुसार, फिर्यादी असलेली २५ वर्षीय तरुणी कायद्याचे शिक्षण घेते. तिच्या मैत्रिणीने अखिलेश राजगुरू हा ज्योतिषी पत्रिका पाहून भविष्य सांगतो, असे तिला सांगितले होते. १२ जुलैला ती आपल्या भावाची पत्रिका घेऊन त्या ज्योतिषाकडे गेली आणि इथेच ती फसली. ज्योतिषाने तिला सांगितले की, तुमच्या भावाला एक खास वनस्पती द्यावी लागेल, ती मागवून घेतल्यानंतर तुम्ही पुन्हा या.१८ जुलैला राजगुरूने तरुणीला ती वनस्पती घेण्याच्या बहाण्याने पुन्हा येण्यास सांगितले. त्यानंतर ती १९ जुलैला धनकवडी येथील भोंदूच्या श्री स्वामी समर्थ ज्योतिष कार्यालयात गेली. त्यावेळी त्याने तिला सांगितले, तुमच्या डोक्यावर ही वनस्पती ठेवून मंत्र म्हणावे लागणार आहेत. तरुणीला त्याचे वागणे गैर वाटले आणि ती तिथून निघण्याच्या प्रयत्नात होती. इतक्यात अखिलेश राजगुरूने अचानक तिला मिठी मारली आणि तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. तरुणीने प्रसंग जाणून धैर्य दाखवत भोंदू ज्योतिषाला विरोध केला तिथून तातडीने निघाली. नंतर आपल्या भावाला फोन करून घडलेला संपूर्ण प्रकार सांगितला. तर ज्योतिषाविरोधात तिने सहकारनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी




तात्काळ राजगुरूच्या कार्यालयावर छापा टाकला आणि त्याला बेड्या ठोकल्या. त्याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पोलिसांनी याप्रकरणी अधिक तपास सुरू केला आहे. या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

# महाराष्ट्रात ठाकरे ब्रँड कधीच संपला; उबाठाचे खासदार आमच्या संपर्कात, गिरीश महाजन यांचं वक्तव्य...

**पंढरपूर :** राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन हे आज पंढरपूर दौऱ्यावर आले असता त्यांनी विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकारांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी नवं भाकीत वर्तवलं. आमच्याकडे खासदारांची संख्या अजून वाढेल. विरोधी पक्षातील अनेक खासदार आमच्या संपर्कात आहेत. यामध्ये उबाठा गटातील खासदार जास्त आहेत, असं गिरीश महाजन म्हणाले. तसेच ठाकरे ब्रँड कधीच संपलाय, अशी टीका देखील गिरीश महाजन यांनी केली.महाराष्ट्रातून ठाकरे ब्रँड कधीच संपला आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे होते. त्यावेळेसचा विषय वेगळा होता. उद्धव ठाकरे २०१९ ला काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसले. बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली दिली. त्याचवेळी ठाकरे ब्रँड संपलाङ्घङ्घ, अशी टीका गिरीश महाजन यांनी केली.शिंदे सरकार कोणत्या सीडीमुळे आले. याचा खुलासा झाला पाहिजे. उगाच हवेत गोळीबार करतात. नाशिकची सीडी सांगतात, काँग्रेस नेते नाना पटोले सीडी, पेन ड्राईव्ह दाखवतात. तो दाखवण्यापेक्षा तो अध्यक्षांना दिला



पाहिजे. कोणी कधीही उठायचं आणि काहीही सांगायचं, याचा काय उपयोग आहे? जर तुमच्याकडे पुरावा असेल तर ते दाखवला पाहिजे, असं गिरीश महाजन म्हणाले.आमच्याकडे खासदारांची संख्या अजून वाढेल. आधीच चार खासदार संपर्कात होते. त्यात अजून तीन खासदारांची वाढ होईल. हे खासदार सर्व पक्षातील आहेत. त्याचबरोबर उबाठा गटातील जास्त खासदार संपर्कात आहेतङ्घङ्घ, असं मंत्री गिरीश महाजन म्हणाले. यावेळी गिरीश महाजन यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीवरही प्रतिक्रिया दिली. ङ्घङ्घविधानसभेच्या काळात दोन नेते एकत्र आले, भेटले, हास्यविनोद झाला, तेवढंच झालं आणि ते असलं पाहिजे ना? नुसतं एकमेकांकडे रागात पाहण्याची किंवा वाईट टिप्पणी करायची गरज नाहीङ्घङ्घ, असं गिरीश महाजन म्हणाले.खासदार संजय राऊत यांनी उद्धव ठाकरेंच्या घेतलेल्या मुलाखतीवरही प्रतिक्रिया दिली. ङ्घङ्घत्या मुलाखतीबद्दल काय बोलावं ते मलाचं समजत नाही. दरवर्षी दोघं मुलाखती घेतात, ठरवून घेतात की, प्रश्न पत्रिका काय, उत्तरपत्रिका काय, आणि प्रश्न-उत्तर करत असतात, सर्व हसत आहेत त्याला, कुणी दुसऱ्याने मुलाखत घेतली तर वेगळा विषय आहे. मी यावर जास्त बोलणार नाही. पण मला असं वाटतं संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांनी दोघांनी एकमेकांची मुलाखत घ्यायची. हा काय विषय होऊ शकतो का? तुम्हीच प्रश्न विचारायचे, तुम्हीच उत्तर ठरवायचं. बघायचं कोणी? लोकं गंमतीने बघतातङ्घङ्घ, असा टोला गिरीश महाजन यांनी लगावला.विरोधी पक्षातील काही खासदार आमच्या संपर्कात आहेत. त्यांच्या संख्येत अजून वाढ होत आहे. आधी ४ होते, आणखी दोन ते तीन वाढत आहेत. विरोधी पक्षातले आहेत, पण उबाठातले जास्त आहेत. पण आता काही कायदेशीर तांत्रिक अडचण आहे. त्यामुळे त्यांचा प्रवेश होऊ शकत नाहीङ्घङ्घ, असंदेखील भाकीत गिरीश महाजन यांनी वर्तवलं.

# आईपासून वेगळं झाल्याचं दु:ख, मोठी आई रागावली, १० वर्षीय मुलाने लहान भावासह घर सोडलं, मुंबईला निघाले अन्..

**नागपूर:** मोठी आई रागावल्याने १० वर्षीय मुलाने नऊ वर्षाच्या चुलत भावासह नागपुरातून पलायन केले. दोघेही विदर्भ एक्स्प्रेसने मुंबईला जायला निघाले. पोलिसांनी वेळीच शोध घेत मलकापूर येथे दोघांना ताब्यात घेतले. मुले सुखरुप आढळल्याने नातेवाइकांनी सुटकेचा निश्वास सोडला. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. मुलगा मुंबईला राहतो. त्याची आई सुरक्षा रक्षक आहे.दीड महिन्यांपूर्वी दहा वर्षीय चेतन (नाव बदललेले) हा मोठ्या आईकडे (मावशी) आला. त्याला नागपुरात चांगले शिक्षण मिळावे यासाठी आईने त्याला नागपुरातच ठेवले. आईपासून दुरावल्याने तो दु:खी झाला. त्याला नागपुरात करमत नव्हते. त्याला शाळेतही दाखल केले. दरम्यान, मोठी आई त्याला रागवायची. त्यामुळे त्याने नागपुरातून पलायनचा निर्णय घेतला. शुक्रवारी चेतन व त्याचा नऊ वर्षीय चुलत भाऊ घरासमोर खेळत होते. घरी कोणी नसल्याचे बघून चेतनने भावासह तेथून पळ काढला.ते आधी मोठा ताजबाग येथे गेले. तेथे थांबले. दरम्यान, एकाचवेळी दोन मुले बेपत्ता झाल्याने नातेवाइकांनी शोध घेतला. नातेवाइकांनी वाठोडा पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी अपहरणाचा



गुन्हा दाखल केला. गुन्हेशाखा पोलिसांनाही दोघांचा शोध सुरू केला. दरम्यान ताजबाग परिसरात राहिल्यानंतर दुसऱ्या दिवशी दोघेही रेल्वेस्थानकावर पोहोचले. विदर्भ एक्स्प्रेसमध्ये बसले. दोघेही मुंबईला निघाले.वाठोडा व गुन्हेशाखा पोलिसांनी सीसीटीव्हीची पाहणी केली असता दोघे रेल्वेस्थानकावर गेल्याचे आढळले. पोलिसांना दोघेही विदर्भ एक्स्प्रेसनमध्ये बसताना दिसले. पोलिसांनी गाडीची माहिती काढली. गाडी मलकापूर रेल्वे स्थानकावर थांबणार असल्याचे पोलिसांना कळाले. पोलिसांनी मलकापूर स्थानकावरील लोहमार्ग पोलिसांना माहिती दिली. लोहमार्ग पोलिसांनी गाडीत शोध घेतला असता दोघेही आढळले. पोलिसांनी नागपूर पोलिसांना कळविले. दोघांना नागपुरात आणून नातेवाइकांच्या स्वाधीन केले. जर हे दोघे मुंबईत निघून गेले असते तर त्यांचा शोध घेणं फार कठीण झालं असतं. त्यामुळे नातेवाइकांनी पोलिसांचे आभार मानले.

# उपजिल्हा रुग्णालयातील एक्स-रे मशीन पंधरा दिवसापासून बंद; शिवसेना (उ.बा ठा) ने पूजन करून घातला हार

## तीन दिवसांत एक्स-रे मशीन सुरू न केल्यास तोडफोड करणाऱ्याचा शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांचा इशारा

जनसंचलन/मलकापुर

उपजिल्हा रुग्णालयातील एक्स-रे मशीन गेल्या पंधरा दिवसापासून बंद असुन उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांना,अपंगांना एक्स-रे मशीन चालक त्याची हेडसांड करून येथील मशीन बंद आहे तर पेशंटला बुलढाणा घेवून जा, एक्सरे काढण्यासाठी प्लेट उपलब्ध नाही असे बेजबाबदारपणाचे उत्तरे देत असल्याने याबाबतची माहिती संजय बुडूखले यांनी शिवसेना उप जिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना देताच त्यांनी पुजेचं साहित्य, अगरबत्ती,हार, फुले घेवून उपजिल्हा रुग्णालय गाठले.

उपजिल्हा रुग्णालयात अधिक्षक डॉ.राजेश उंबरकर उपस्थित नसल्याने त्यांचा कर्मचाऱ्यांवर वचक राहिला नाही.दर बुधवारी दिव्यांग तपासणी शिबिर घेण्यात येत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी एक्स- रे विभाग गाठला पंधरा दिवसांपासून बंद असलेल्या मशीन ची पुजा करुन हार-फुले वाहून भ्रमणध्वनीवरून अधिक्षक डॉ. राजेश उंबरकर यांना उपजिल्हा रुग्णालयात आर्थिक भुर्दंड सोसून रुग्णांना ये-जा चे हेलपाटे घालावे लागतात,तिन दिवसांत एक्स-रे मशीन पुर्ववत सुरू न केल्यास मशीन ची तोडफोड करणाऱ्याचा इशारा उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी दिला. यावेळी शिवसेना विधानसभा संघटक राजेशसिंह राजपुत, शिवसेना




शहरप्रमुख हरीदास गणबास, किसानसेना तालुकाप्रमुख महादेव पवार, किसानसेना शहरप्रमुख सै.वसीम सै.रहीम,रुग्ण राधेश्याम शर्मा,चंदुभाऊ चित्ते,आशा चित्ते दुर्गा नगर,उषाबाई पवार, अश्विनी गवर बेलाड यांचेसह युवा सेना तालुकाप्रमुख पवन गरुड, शिवसेना उपशहरप्रमुख शकील जमादार,वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी,सत्तार शहा सह शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# सरस्वती सिनियर विद्यालय मलकापूर येथे महापुरुषांच्या फोटोचा अनुचित प्रकार...

## ठाणेदार गणेश गिरी व पत्रकार करण झनके यांच्यामुळे कायदा सुव्यवस्था प्रश्न टळला

जनसंचलन/मलकापूर

सरस्वती सिनियर विद्यालय मलकापूर येथे अनुचित प्रकार होत असल्याने विद्यार्थ्यांनी शिक्षकांना जाब विचारला त्यावर अनावश्यक,उडवाउडवीचे उत्तर दिल्याने कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न उपस्थित झाला. मात्र ठाणेदार गणेश गिरी व पत्रकार करण झनके यांच्या भूमिकेने विद्यार्थ्यांचा रोष शांत होऊन महापुरुषांचे फोटो सन्मानपूर्वक भिंतीवर लावण्यात आले. याबाबत असे की,मलकापूर येथील सरस्वती विद्यालय मध्ये शाळेचा दाखला घेण्यासाठी विद्यार्थी गेले असता महापुरुषांचे फोटो भिंतीवर दिसून आले नाही. याबाबत संबंधित शिक्षकाला जाब विचारला असता अनावश्यक व उडवाउडवीचे उत्तरे संबंधितांकडून देण्यात आली व फोटो दुसरीकडे पडलेले दिसून आले. कार्यालयात महापुरुषांचे फोटो न लावल्याने व विटंबना होत असल्याची माहिती विद्यार्थ्यांनी पत्रकार करण झनके यांना दिली व ते तेथे तत्काळ पोहचले. झनके यांनी कर्मचाऱ्यांशी चर्चा केली मात्र कर्मचाऱ्यांनी उडवाउडवीचे उत्तर दिल्याने



मलकापूर शहर पोलीस स्टेशनला कारवाई अनुषंगाने गेले.ठाणेदार यांनी तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देऊन घटनास्थळी जाऊन झालेल्या घटनेचे चौकशी केली. सदर प्रकार अनुचित असल्याने ठाणेदार गणेश गिरी यांनी कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. या रोषाला तुम्ही जबाबदार असल्याचे सांगुन तात्काळ कार्यालयात महापुरुषांचे फोटो लावून त्यांना पुष्पहार अर्पण करण्याचे सांगितले. त्यावरून विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे फोटो कार्यालयात सन्मानपूर्वक लाऊन फोटो ला हार चढवला. एकंदरीत या घटनेतून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला होता मात्र ठाणेदार गणेश गिरी साहेब व पत्रकार करण झनके यांच्या सकारात्मक भूमिकेने रोष शांत झाला.यावेळी उपस्थिती प्रा.शुभम प्रवीण सावळे,आदेश प्रभाकर इंगळे,विद्यार्थी हर्षल गजानन मेसरे, गौरव इंगळे, सनी इंगळे हे होते.

# नशा मुक्त भारतासाठी कोलते महाविद्यालयाचा सामाजिक पुढाकार


जनसंचलन/मलकापूर

पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर येथे दिव्य ज्योती जागृती संस्थान, आय.क्यू.ए.सी. आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने नशा उन्मूलन जनजागृती कार्यक्रम उत्साहात व प्रभावी पद्धतीने नुकताच संपन्न झाला.या विशेष उपक्रमासाठी साध्वी सुश्री रुचिका भारतीजी (आध्यात्मिक प्रवक्त्या, युवा मार्गदर्शिका व व्हायोलिनवादक) आणि साध्वी सुश्री शुभप्रदा भारतीजी (अमरावती शाखा प्रमुख) या मान्यवर अध्यात्मिक वक्त्यांना प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्यासमवेत डॉ. जयश्री खर्चे यांचीही उपस्थिती लाभली. दिव्य ज्योती जागृती संस्थेचे संस्थापक व संचालक पूज्य श्री आशुतोष महाराजजी यांच्या आध्यात्मिक आशीर्वादाने हा कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नैतिक मूल्ये आणि नशा उन्मूलनाबाबत जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व माँ सरस्वती पूजनाने अत्यंत पावन वातावरणात पार पडली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी प्रमुख अतिथी साध्वी सुश्री रुचिका भारतीजी यांचे शाल व श्रीफळ देऊन मनोभावे स्वागत केले. यावेळी आय.क्यू.ए.सी. प्रमुख प्रा. रमाकांत चौधरी यांनी साध्वी शुभप्रदा भारतीजी यांचेही शाल व श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक स्वागत केले. कार्यक्रमात बोलताना साध्वी सुश्री रुचिका भारतीजी यांनी अत्यंत प्रभावी शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी जीवनातील नशेचे दुष्परिणाम, आत्मविकास, मानसिक स्वास्थ्य आणि नकारात्मक सवयींपासून दूर राहण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये अध्यात्मिक दृष्टीकोनातून आत्मसंयम व आत्मबल वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. साध्वी शुभप्रदा भारतीजी यांनी समाज व राष्ट्राच्या उन्नतीसाठी तरुणाईने नशा मुक्त जीवन स्वीकारणे कसे आवश्यक आहे, हे उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमादरम्यान आपल्या वैयक्तिक व सामाजिक समस्यांवर अतिथींशी संवाद साधत समाधानकारक मार्गदर्शन प्राप्त केले. उपस्थित सर्वांनी कार्यक्रमात अतिशय सकारात्मक सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे समर्पक सूत्रसंचालन प्रा. अंकुश नारखडे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन बोरले, प्रा. अभिजीत अग्रवाल, प्रा. प्रविण पाटील, प्रा. सुदेश फरपट, प्रा. अमोल हलदे, प्रा. सचिन भोळे, प्रा. मनीष अचलिया, प्रा. योगेश जाधव, तसेच कॉम्प्युटर विभागाचे विद्यार्थी, महिला कर्मचारी आणि महाविद्यालयातील अन्य विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय प्रशासन, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमाचे नियोजन आय.क्यू.ए.सी. आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या सहकार्याने केले गेले.कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी अतिथींना धन्यवाद देत महाविद्यालयात अशा सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन पुढेही होत राहील, असा विश्वास व्यक्त केला.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. श्री. ज्ञानदेव पाटील सर आणि सचिव डॉ. अरविंद कोलते यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये नशा उन्मूलनाबाबत सकारात्मक विचार रुजवले असून, सामाजिक जाणीव व सजगतेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे

# विठ्ठलवाडी ग्रामपंचायतची पुनर्रचनेवर हरकत!

जनसंचलन/ डोणगाव

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने जिप व पंस निवडणूक प्रक्रियेत पूर्नररचना केली आहे.मात्र मेहकर तहसील अंतर्गत येणाऱ्या विठ्ठलवाडी, उधवा या ग्रामपंचायतने पूर्नरचनेवर हरकत घेऊन सदर गावाचा समावेश डोणगाव सर्कल मध्ये न करता, देऊळगाव साखरर्शा सर्कलमध्ये करण्यात येण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायत विठ्ठलवाडीची १८ जुलै रोजी सरपंच धनराज राठोड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.बैठकीत सचिव यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीसर्कलच्या पुनर्रचनेची माहिती दिली. सदर पूर्णरचनेनुसार विठ्ठलवाडी गावाचा समावेश हा पूर्वी घाटबोरी सर्कलमध्ये होता.परंतु अलीकडील बदलानंतर या गावाचा समावेश डोणगाव सर्कलमध्ये करण्यात आला आहे.विठ्ठलवाडी गावाचा भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक दृष्टिकोनातून देऊळगाव साखरशा या गावाशी जवळचा व सुसंगत संबंध आहे.त्यामुळे विठ्ठलवाडी गावाचा देऊळगाव साखरशा सर्कल मध्ये समावेश करण्यात यावा, अशी हरकत तहसील कार्यालय मेहकर येथे नोंदविण्यात आली आहे. याबाबतचा ठराव १४ जुलैला ग्रामपंचायतमध्ये पारित करण्यात आला.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पूर्णा नदीपात्रातून वाळू माफियांकडून रात्रंदिवस केनी व जेसीबीच्या साह्याने केला जातो हजारो ब्रास रेतीचा उपसा

## देऊळगाव राजा ते बुलडाणा रस्त्यावर रातच्याला चाले अवैध रेती वाहतुकीचा खेळ महसुल विभागाचा काय आहे मेळ!

## महसूल प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष...

**जनसंचलन/बुलडाणा**

शेगाव तालुक्यातील भास्तन येथील पूर्णा नदी पात्रातून भोटा,कठोरा सगोडा या घाटातून परिसरातील वाळू माफिया हे कुणालाही न भिता दिवस रात्र अवैध रित्या केनी व जेसीबीच्या साह्याने अवैध रित्या हजारो ब्रास रेतीचा साठा उपसत असल्यामुळे महसूल विभागाला कोट्यावधी रुपयाचा चुना लावत असून महसूल बुडवीत आहेत तरी सदर वाळु माफियाविरुद्ध महसूल प्रशासनाच्या वतीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे..

सविस्तर माहिती अशी की शेगाव तालुक्यातील येथून जवळच असलेल्या भास्तन येथील पूर्णा नदी पात्रातून भोटा, कठोरा, सगोडा या शिवारातील घाटातून शासनाच्या वतीने नदीपात्रातील कोणत्याही घाटाचा लिलाव झालेला नसताना सुद्धा महसूल प्रशासनाच्या नाकावर टिचून खुल्याआम पने जराही भीती न बाळगता परिसरातील वाळू माफिया हे मोठ्या प्रमाणात रात्रंदिवस पूर्णा नदीपात्रातून हजारो ब्रास रेतीचा अवैध रित्या उपसा करीत असल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे..

येथील पूर्णा नदीपात्रातून रात्रंदिवस खुलेआमपणे अवैध रित्या रेतीचे उत्खनन होत असताना सुद्धा परिसरातील तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, एचडीओ व महसूल प्रशासन सदर वाळू माफियाविरुद्ध कारवाई करण्यास का मागेपुढे पाहत आहे असा प्रश्नही परिसरातील नागरिकांमध्ये उपस्थित केल्या जात आहे. तरी आता या बाबीकडे जिल्हा अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष घालण्याची गरज आहे अशी मागणी ही होत आहे.

तर परिसरातील रेती तस्करांचे रोडवर विशेष पथक तैनात असून रात्रंदिवस पेट्रोलिंग करून रोड क्लियरच्या सूचना देऊन मोठ्या प्रमाणात






अवैधरित्या रेतीची वाहतूक करून महसूल प्रशासनाची दिशाभूल करतात पन प्रशासन मात्र मुंग गिळून गप्प असल्याची चर्चा आहे. पूर्णा नदीपात्रातून सध्या मोठ्या प्रमाणात रेतीची तस्करी केली जात असून यामधून अनेक वाळू माफिया गब्बर झाले असून ते सबकुछ मॅनेज है ची भाषा करीत असल्याचे समजते.तर रेती घाटातून रेतीची अवैध वाहतूक करण्यासाठी रेती माफियांनी वेळेचे सुद्धा भान ठेवले आहे तर यामुळे तालुका प्रशासनाचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडत असून याकडे खनीकर्म विभागाकडून बघ्याची भूमिका घेतल्या जात असल्यामुळे या वाळू माफियांचे आता मुस्क्या कोणावर असा प्रश्नही उपस्थित केल्या जात आहे

---

# दुसरबीड बसस्थानकावर एलसीबीची कारवाई!




**जनसंचलन/ किनगाव राजा**

अवैध देशी- विदेशी दारूचा महापूर जिल्ह्यात उसळत असून, राज्य उत्पादन शुल्क म्हणा की पोलिसांच्या कारवाई वरून हे स्पष्ट होत आहे. किनगाव राजा येथे एलसीबी पथकाने कारवाई करत ६ देशी दारूचे २२,४०० रुपये किमतीचे बॉक्स ताब्यात घेऊन एका आरोपीला अटक केली आहे. दुसरबीड बसस्थानकावर ही कारवाई करण्यात आली.दारुत कुणाचे हात ओले? हा प्रश्न उपस्थित होत आहे. दारूमुळे अनेकांचे संसार उद्धवस्त होत आहे,हे सर्वश्रूत असले तरी,बुलढाणा जिल्ह्यात अवैध दारू विक्री दिवसागणिक वाढत आहे. काही पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कर्तव्याला बगल देत,दारूत हात ओले करीत असल्याचा दावा केला जात आहे. सध्या दारूचे दर वाढले असून, अवैध दारू विक्रेते बक्कळ पैसा कमावण्याचा नाद करत आहेत. दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी अशा दारूमफिया विरुद्ध मोहीम सुरू केली.त्यांच्या आदेशावरून व एलसीबी पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वात एलसीबी पथकाने कारवाई करत ६ देशी दारूचे २२,४०० रुपये किमतीचे बॉक्स ताब्यात घेऊन एका आरोपीला अटक केली आहे. ही कारवाई एएसआय ओमप्रकाश सावळे,एचसी दिगंबर कपाटे, पीसी दीपक वायाळ, एलएचसी वनिता शिंगणे,चालक पीसी निवृत्ती पूंड यांनी केली.

# नगरपालिकेची उदासीनता नागरिकांच्या जीवावर!

## साफसफाईचा २ कोटी ८१ लाखाचा ठेका घेऊनही घाणीचे साम्राज्य!

**जनसंचलन/ चिखली**

साफसफाईचा तब्बल २ कोटी ८१ लाखाचा ठेका घेऊनही नगरपालिकेच्या दुर्लक्षितपणाने शहरात अस्वच्छता नांदत असल्याचे घाणेरडे चित्र निर्माण झाले आहे.शिवसेना संलग्नित युवा सेनेच्या वतीने याबाबत संताप व्यक्त करण्यात आला आहे. पावसाळ्या पूर्वीच्या साफसफाईकडे नगर पालीकेने दुर्लक्ष केल्यामुळे शहरातील अनेक वार्डात असलेल्या सर्व्हिस नाल्या तुडूंब भरल्या आहेत. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली. ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचले आहे.त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. चिखली शहरात लोकसंख्या वाढत असून वाढत्या लोकसंख्येमुळे शहर स्वच्छतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. परंतु पालिका पदाधिकारी राजकीय फायद्याच्या दृष्टीने काम करतात. त्यामुळे पालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील त्याचा धाक कमी झाला आहे. कर्मचारी फक्त अर्थपूर्ण कामाकडे लक्ष देत असल्यामुळे नागरिकांना सुखसुविधा मिळणे कठिण झाले आहे. कचरा जमा करण्यासाठी शहरात फिरणारी घंटागाडी महिना-पंधरादिवसातून कधी कधी दिसते. त्यामुळे अनेक वार्डातील विविध चौकात घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. सफाई कामगारांकडे ठेकेदार तसेच पालिका पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्यामुळे अनेक वार्डातील सर्व्हिस नाल्या तुडुंब भरल्या आहेत. या नाल्यात घाण कुजत असल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरून परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याशिवाय अंतर्गत रस्त्यांची दूरवस्था झाली आहे. काही जुन्या रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. तर नवीन रस्त्यांच्या दर्जा सुमार असल्यामुळे ठिकठिकाणी घाण पाणी



साचत आहे. त्याचाही परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. शहरातील मुख्य रस्त्यालगत असलेली झाडे-झुडपी तोडण्यात न आल्यामुळे कचरा अटकून घाण पाणी रस्त्यावर तुंबत आहे. त्यावर नागरिक व विद्यार्थ्यांची ये-जा असते. वाहनेही वेगाने धावत असतात. यामुळे घाण पाणी अंगावर उडते. त्याचाही परिणाम आरोग्यावर होत आहे.काही दिवसांपूर्वी डफडे बजाओ आंदोलन केल्यानंतरही प्रशासनाची कुंभकर्णी झोप उघडली नाही, त्यामुळे सार्वजनिक आरोग्य जपण्यासाठी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८